APD/ICD/2013-14/27
04/01/2014

# मुंबई विद्यापीठ

अत्यंत तातडीचे

## परिपत्रक :—

विषय:— अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन/पुनर्मुल्यांकनकरण्याबाबत

संदर्भ:— १)भारतीय राजपत्र दि. १९ जानेवारी २०१३, प्राधिकार अन्वये प्रकाशित
२)शासन पत्र क्र. अमवि/२०१३/मवि—२/७६/४२/३३८४ दि. १८ जून २०१३
३)विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.नि.वि.वि/२३५/१०/ दि. २१ जून २०१३
४) विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.नि.वि.वि/२३५/१५/२०१३ दि. २९ जून २०१३
५) विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.नि.वि.वि/२३५/२३/२०१३ दि. २१ सप्टेंबर २०१३

प्राचार्य, सर्व संलग्नित अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये यांना उपरोक्त संदर्भाविषयी कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयांनी मुल्यांकन व ज्या महाविद्यालयांचे मुल्यांकन झाले आहे, त्या महाविद्यालयांनी निर्धारित कालावधीनंतर पुनर्मुल्यांकन करून घेणे अनिवार्य आहे.

उपरोक्त विषय व संदर्भीय परिपत्रकानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील तक्यात सहाय्यक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन व विकास विभाग, क्र. १३२, मुंबई विद्यापीठ, मुख्य इमारत, मुंबई ४०० ०३२, येथे Email- apdsection@gmail.com मार्फत तसेच पत्रव्यवहार करून त्वरीत सादर करावा.

| अ क्र | संस्थेचे तसेच महाविद्यालयाचे नाव | महाविद्यालय सुरू झालेले वर्ष | महाविद्यालयाचे मुल्यांकन झाल्याचे वर्ष | महाविद्यालयाला मुल्यांकन मिळाल्याचा दर्जा | महाविद्यालयाचे मुल्यांकन झाले नसल्याची कारणे | महाविद्यालयाचे पुनर्मुल्यांकन केल्याचे वर्ष | महाविद्यालयाला पुनर्मुल्यांकनामध्ये मिळालेला दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|---|

तसेच आपणांस असेहि कळविण्यात येते की, जे महाविद्यालय/संस्था अशा प्रकारच्या मुल्यांकनाचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे विहित मुदतीत पाठविणार नाहीत तसेच विद्यापीठास लेखी स्वरूपात कळविणार नाहीत अशा महाविद्यालयाच्या विरूध्द शासन निर्णयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

तसेच उपरोक्त परिपत्रकानुसार ज्या महाविद्यालयांनी विद्यापीठास माहिती सादर केलेली आहे. त्या महाविद्यालयांनी पुन्हा माहिती पाठविण्याची आवश्यकता नाही.

राजपाल हांडे

मुंबई — ४०० ०३२
४ जानेवारी २०१४

प्राचार्य (डॉ.) राजपाल श्री. हांडे
(संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ)

प्रति,
प्राचार्य सर्व संलग्नित अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालय यांचे माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना

C1/Kamal/Marathi/412014